**मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**सायबर गुन्हे कक्ष**
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-१२७/२०२२ दिनांक :- ०४/०५/२०२२

# प्रसिध्द राजस्थानी महीला कलाकार यांना अश्लिल फोटो पाठवून सोशल मिडीया (INSTAGRAM) द्वारे धमकावणाऱ्या आरोपीतास पकडण्यात सायबर गुन्हे कक्षास यश...

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या प्रसिध्द राजस्थानी महीला कलाकार यांनी सायबर गुन्हे कक्ष येथे त्यांचे वैयक्तीक फोटोचे अश्लिल मोर्फींग करुन सदरचे फोटो **evil_of_o** व **sabkil_of_o** हया इंस्टाग्राम आयडीवरुन पाठवून त्रास देत असलेबाबत तक्रार सायबर गुन्हे शाखा आवक अर्ज क्र. ३३२-बी/२०२२ दिनांक २९/०३/२०२२ अन्वये प्राप्त झाली होती.

सदर तक्रारीची तांत्रीक चौकशी केली असता नमुद इन्टाग्राम आयडीमध्ये कोणतेही फॉलोवर्स अथवा मित्र आढळून आले नाही. तसेच INSTAGRAM कडून प्राप्त माहीतीमध्ये आरोपीचे कोणतेही नाव,पत्ता,ईमेल आयडी अशा प्रकारची कोणतीही माहीती मिळून आली नाही. त्यामध्ये नमूद मोबाईलचे सीडीआर मध्ये ही कोणत्याही प्रकारचे कॉलींग झाल्याचे दिसून आले नाही.

तरी देखील सायबर गुन्हे कक्ष यांनी वेळोवेळी पाठपुरावा करुन तसेच कौशल्यपुर्वक तांत्रीक तपास करुन सिम ॲक्टीवेट करताना दिलेला पर्यायी नंबरचे विश्लेषणामध्ये नमुद मोबाईल नंबर विलेपार्ले, मुंबई येथील महीलेचा असलेबाबत माहीती प्राप्त झाली. सदर महीला यांना विश्वासात घेवून चौकशी केली असता त्यांनी त्यांचे नावे असलेले नमूद सिमकार्ड हे त्यांचे ओळखीचे इसम नामे राहूल यास वापरण्याकरीता दिले परंतू त्याचे वास्तव्याबाबत सध्या काहीएक माहीती त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. त्यावरुन अनोळखी इसम राहूल याचा सांताक्रुझ परीसरात शोध घेवून संशयति इसम **चैनारामदुर्गा राम ऊर्फ राहुल ओसवाल ऊर्फ राहुल कुमावत, वय - २२ वर्षे रा. ओसवाल मेडिकल, क्वीन्स पार्क बिल्डींग, शॉप नं ५, सांताक्रुझ प मुंबई** यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता ती सदरचा प्रकार केलेची कबुली दिली असुन गुन्हयातील सहभाग निष्पन्न झालेला आहे.

सदर महीला तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी वरुन नमुद आरोपी विरुध्द भाईंदर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. २२९/२०२२ भादविस कलम ३५४(ड), ३८५ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (क),६७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच नमुद आरोपीतास अटक करण्यात आलेली आहे. अधिक तपास भाईंदर पोलीस ठाणे करीत आहेत.

नमुद आरोपीने वापरलेले इंस्टाग्राम आयडी व मोंबाईल क्रमांक ची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | INSTAGRAM आयडी | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १. | **evil_of_o** | ९८६७९७०९३८ |
| २. | **sabkil_of_o** | |

**तरी मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे इन्टाग्राम अथवा कोणत्याही सोशल मिडीयावर अश्लिल फोटोस व्हायरल/प्रसारीत करणे कायदयाने गुन्हा आहे. कोणताही इसम असे कृत्य करुन त्रास देत असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी डॉ.श्री.महेश पाटील,पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्ष येथील पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गंजकर, सपोनि स्वप्निल वाव्हळ, ,पोलीस अंमलदार/१२०९५ गणेश इलग, पोलीस अंमलदार/१२०९२ प्रविण आव्हाड, महीला पोलीस अंमलदार/१३१०४ पल्लवी निकम यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

---oo---